**नि.दि.दा.क्र. ३३५/२०११**

विठ्ठल लबडे व इतर वि. राजाराम व इतर

**नि.क्र.११९.**

**वादींतर्फे साक्षीदार क्र.४**

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| नाव | – | गणेश चांगदेव कडु |
| वय | – | ३५ वर्षे, |
| व्यवसाय | – | पुरवठा लिपीक, तहसिल कार्यालय, कर्जत |
| राहणार | – | कर्जत, ता. कर्जत, जि. अहमदनगर. |

**वादीतर्फे सरतपास विधिज्ञ श्री.ए. एस. पुंडे यांच्यामार्फत शपथेवर सुरु**

मी पुरवठा लिपीक म्हणुन तहसिल कार्यालय, कर्जत येथे ६ महिन्यांपासुन कार्यरत आहे. मी माझ्यासोबत रेशनचे मुळ संदर्भ रजिस्टर आणलेले आहे. आता मला नि.क्र.११६ वरील यादीमधील दस्त क्र. १ दाखवला. पाहुन सांगतो की, दस्तावर ६९ क्रमांकाची नोंद आहे. ती नोंद लबडे मैनाबाई राजाराम यांच्या नावची आहे. त्यावर शिधापत्रिका क्र. ४०२७३ अशी नोंद आहे. त्यावर कुटुंबप्रमुख म्हणुन मैनाबाई यांचे नाव आहे व सदस्य म्हणुन लबडे दत्तु राजाराम, लबडे विठ्ठल राजाराम, लबडे राणी विठ्ठल, लबडे प्रतिक विठ्ठल अशी नावे आहेत. माझ्याकडील आणलेले मुळ संदर्भ रजिस्टरची सत्यप्रत मी अभिलेखावर दाखल केलेली आहे. मुळ प्रमाणे ती खरी व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१२०** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते ३, २० व २२ तर्फे विधिज्ञ श्री. एन. एस. खरात यांच्यामार्फत शपथेवर सुरु –**

२. सदर रजिस्टरवर पहिल्या पानावर संदर्भ रजिस्टर म्हणुन लिहिलेले नाही व त्याचे पहिले काही पाने फाटलेले आहे. हे खरे आहे की, सदर रजिस्टरवर अनुक्रमाणिका नाही. हे खरे आहे की, सदरचे रजिस्टर कधी तयार केले आहे याची नोंद

रजिस्टरमध्ये नाही. हे मला माहित नाही की, सदरचे रजिस्टर कोणी लिहिले व कधी लिहिले. रजिस्टरची काही पाने पुर्ण फाटलेली आहेत. हे खरे आहे की, मी दाखल केलेल्या सत्यप्रतिचे मुळ पान हे रजिस्टरपासुन वेगळे झालेले आहे. ते कधी रजिस्टरपासुन वेगळे झाले हे मला सांगता येणार नाही. शिधापत्रिकेत नवीन नाव अंतभुर्त करण्यासाठी अर्ज घेतला जातो. मुळ रजिस्टरवर शिधापत्रिका डुप्लीकेट देण्याबाबतची नोंद दि. २२/११/२०१० या तारखेची आहे. सदर शिधापत्रीकेत नाव अंतभुर्त करण्यासाठी अर्ज कोणी दिला व कधी दिला याची नोंद नाही. त्या अर्जामध्ये काय मजकुर नमुद केला होता हे मला सांगता येणार नाही. तो अर्ज मी सोबत आणलेला नाही. डुप्लीकेट शिधापत्रिका देण्याबाबतची नोंद केलेली आहे, त्याखाली कोणी सही केलेली आहे हे मी सांगु शकत नाही. विठ्ठल लबडे व दत्तु लबडे यांची नावे मुळ शिधापत्रीकेत कधी आले त्याची तारिख मी सांगु शकत नाही. ते नावे कधी आले याबद्दलची नोंद नि.क्र.१२० वर नाही. शिधापत्रिका मागणीसाठी अर्जदाराने अर्ज द्यावा लागतो. हे खरे आहे की, विवाह झाल्यानंतर नाव शिधापत्रीकेत अंतभुर्त करणेसाठी माहेरीकडील नाव कमी केल्याबाबतचा दाखला घेतला जातो. राणी लबडे हिचे नाव शिधापत्रीकेत अंतभुर्त करण्यासाठी तिच्याकडुन काय कागदपत्रे घेतले हे मी सांगु शकत नाही. हे खरे आहे की, महिलांचे नाव शिधापत्रीकेत घेण्यासाठी तिच्या माहेरकडील शिधापत्रीकेतील नावाच्या संदर्भातील दाखल्याशिवाय नोंद घेत नाही. शिधापत्रीकेत नाव अंतर्भुत करण्यासाठी आम्ही तिचे इतर ठिकाणी नाव नसल्याबाबत खात्री करतो व त्याची नोंद घेतो. संदर्भ रजिस्टरमध्ये राणी लबडेच्या बाबतीत नोंद घेतल्याचे दिसुन येत नाही. मैनाबाई लबडे हिने कुटुंबातील इतर सदस्यांची नावे शिधापत्रीकेत अंतर्भुत करण्याबाबतचा अर्ज आमच्याकडे नाही. हे खरे आहे की, शिधापत्रीकेत नाव कमी करण्यासाठी किंवा दाखल करण्यासाठी अर्ज घ्यावा लागतो. हे खरे आहे की, नवीन शिधापत्रिका काढण्यासाठी संबंधीताकडुन अर्ज घ्यावा लागतो. हे मी सांगु शकत नाही की, कुटुंबप्रमुख म्हणुन मैनाबाई लबडे यांनी इतर सदस्यांची नावे व त्यांचे स्वतःचे नाव शिधापत्रीकेत टाकण्यासाठी अर्ज दिला होता किंवा नाही. हे खरे आहे की, नि.क्र.१२० वरील नोंदीवर कोणत्या तहसिलदाराने व कधी सही केली हे मला सांगता येणार नाही. हे खरे नाही की, मी दाखल केलेले नि.क्र.१२० वरील मुळ रजिस्टरमधील सुट्टे पान हे नंतर तयार केलेले आहे. हे खरे नाही की, नि.क्र. १२०

वरील प्रत ही आम्ही वादीच्या सांगण्यावरुन खोटी तयार केली आहे. हे मी सांगु शकत नाही की, नि.क्र.१२० वरील प्रत खरी नसल्यामुळे ती मुळ संदर्भ रजिस्टरमध्ये गुंतलेली नाही. हे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे. हे खरे आहे की, मुळ संदर्भ रजिस्टरची मला काहीएक कल्पना नाही व त्यामुळे त्या रजिस्टर संदर्भातील माहितीबद्दल मला काही सांगता येणार नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

**उलटतपास प्रतिवादी क्र ४ ते १९ व २१ यांच्यामार्फत –**

**प्रतिवादी क्र ४ ते १९ व २१ पुकारले असता गैरहजर. करिता त्यांचेविरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात येतो.**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष,

(आर. बी. राऊत)

दि.१२/३/२०२६

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कर्जत.

जि. अहमदनगर